# फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेजमुळे यंदाच्या उत्सवपर्वात ७०,००० प्रत्यक्ष आणि लाखो अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार

- *पुरवठा साखळीत प्रत्यक्ष रोजगार निर्माण करणार, विक्रेत्यांची ठिकाणे, किराणा दुकाने, डिलिव्हरी भागीदार, सुरक्षा आणि वाहतूक भागीदार यांच्यासह व्यवसायात लाखो अतिरिक्त अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करणार*
- *सर्व नव्या कर्मचाऱ्यांना ई-कॉमर्सच्या अधिक सखोल बाबींचे प्रशिक्षण देऊन कौशल्यवृद्धी करणार*

**बंगळुरू - सप्टेंबर १५, २०२० :** संपूर्ण देश आगामी उत्सवपर्वासाठी सज्ज होत असताना फ्लिपकार्ट ही भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठ आपल्या बिग बिलियन डेजच्या (बीबीडी) माध्यमातून ७०,०००हून अधिक प्रत्यक्ष आणि लाखो हंगामी अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करण्यास मदत करणार आहे. फ्लिपकार्टच्या पुरवठा साखळीच्या सर्व टप्प्यांवर थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, ज्यांत डिलिव्हरी एग्झिक्युटिव्ह, पिकर्स, पॅकर्स आणि सॉर्टर्स यांचा समावेश आहे. त्याचबरोबर फ्लिपकार्टच्या विक्रेते भागिदारांच्या ठिकाणी आणि किराणा दुकानांमध्ये अतिरिक्त अप्रत्यक्ष रोजगार निर्माण केले जातील. याला जोड म्हणून सगळा ई-कॉमर्स व्यवसाय उत्सवकाळासाठी सज्ज होत असताना विक्रेत्यांची ठिकाणे आणि वाहतूक भागीदारांच्या पूरक उद्योगांतही रोजगारनिर्मिती केली जाईल. उत्सवपर्वासाठी या व्यवसायातील लाखो घटक सज्ज होत असताना पुरवठा साखळीचा विस्तार आणि सशक्तीकरण यांच्यातून ई-कॉमर्सच्या नव्या दशलक्षावधी वापरकर्त्यांना विनासायास ऑनलाइन खरेदीचा अनुभव देण्यासाठी एक मजबूत व्यवस्था तयार होईल.

बिग बिलियन डेजची गुंतागुंत आणि भव्यता लक्षात घेता त्यात क्षमता, साठवणूक, छाननी, पॅकेजिंग, मनुष्यबळ, प्रशिक्षण आणि वितरण यांच्यात मोठ्या गुंतवणुकीची गरज पडते आणि त्यातून उत्सवपर्वात अतिरिक्त रोजगाराची निर्मिती होते. या वर्षी फ्लिपकार्ट पुरवठासाखळीत जवळपास ७०,००० जणांना रोजगार देणार असून त्याचबरोबर विक्रेते आणि व्यवसायातील अन्य भागीदारांच्या कामकाजाच्या ठिकाणी लाखो अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करणार आहे. फ्लिपकार्टच्या डिलिव्हरीच्या अंतिम टप्प्यासाठी ५०,०००हून अधिक किराणा दुकानांना सोबत घेतल्यामुळे या उत्सवकाळात लक्षावधी पॅकेजेसची डिलिव्हरी करण्यासाठी हजारो हंगामी रोजगार तयार होतील.

**फ्लिपकार्टच्या ईकार्ट आणि मार्केटप्लेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष अमितेश झा** म्हणाले, "आमचे ग्राहक आणि व्यवसायातील भागीदार यांच्या आयुष्यातील उत्सवांचे महत्त्व आम्ही जाणतो. ही संपूर्ण परिसंस्था बिग

बिलियन डेजसाठी (बीबीडी) सज्ज होत असताना आम्ही या परिसंस्थेच्या विकासासाठी अतिरिक्त संधी निर्माण करताना ग्राहकांना खरेदीचा उत्तम अनुभव देणाऱ्या प्रभावशाली भागीदाऱ्या निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. ई कॉमर्स क्षेत्रातील आघाडीची कंपनी म्हणून आम्ही आमच्या कामगारांच्या प्रशिक्षणात आणि रोजगारांत किती गुंतवणूक करतो आणि कौशल्यविकासाला हातभार लावून रोजगारक्षमतेत कसे योगदान देतो, ते सर्वज्ञात आहे. रोजगारनिर्मिती करून आणि आमच्या विक्रेत्यांना या काळात व्यवसायवृद्धीची संधी निर्माण करून आम्ही या उद्योगाच्या आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाला हातभार लावत आहोत."

थेट नोकरीत घेतलेल्या कर्मचाऱ्यांचे पुरवठा साखळीच्या व्यवस्थापनाचे आकलन व्यापक बनविण्यासाठी फ्लिपकार्ट त्यांच्यासाठी शिकवणीचे वर्ग आणि डिजिटल प्रशिक्षण यांचा मेळ साधणार आहे. यांत ग्राहक सेवा, डिलिव्हरी, उभारणी, सुरक्षा, स्वच्छतेचे उपाय याचबरोबर हातात धरून वापरण्याच्या उपकरणांची कार्यपद्धती, पीओएस मशीन्स, स्कॅनर्स, विविध मोबाइल ॲप्लिकेशन्स आणि ईआरपीज यांचा समावेश आहे. या काळातील प्रशिक्षणाचा सहभागी कामगारांना भविष्यवेधी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी उपयोग होईल आणि भारतात वेगाने वाढणाऱ्या ई कॉमर्स उद्योगात कारकीर्द घडवण्यासाठी ते सक्षम होतील.

उत्सवपर्वाच्या महिन्यांची आधीपासूनच तयारी करणारे लाखो विक्रेते भागीदार, लघु आणि मध्यम उद्योग आणि कारागीर इत्यादींना फ्लिपकार्ट स्वतंत्रपणे गोदामाचे व्यवस्थापन, पॅकेजिंग आणि इतर अनेक गोष्टींचे प्रशिक्षण देते. कामगारांना रोजगार देण्याची आणि त्यांच्या कौशल्यवृद्धीची संपूर्ण प्रक्रिया सरकारच्या राष्ट्रीय कौशल्यविकास मोहिमेला अनुसरून केली जाते आणि ती स्थानिक रोजगारवृद्धी आणि अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर चालना देईल.

आसामातले नानगाव आणि महाराष्ट्रातील हदासपूरपासून आणि केरळातील कन्नूरपर्यंत १००% सेवायोग्य पिनकोड्सवर लक्षावधी ग्राहकांना लक्षावधी वस्तू पोहोचवणारी तंत्रज्ञान-सक्षम मजबूत पुरवठा साखळी फ्लिपकार्टकडे आहे. गेल्या अनेक वर्षांत फ्लिपकार्टने या पुरवठासाखळीतून लक्षावधी स्थानिक रोजगारसंधी निर्माण केल्या आहेत आणि त्याचबरोबर द बिग बिलियन डेजच्या माध्यमातून उद्योजकतेच्या आणि उत्सवी रोजगारांच्या संधीही निर्माण केल्या आहेत.

## About the Flipkart Group

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 250 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has inspired us to innovate on many industry firsts.

The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns –customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, PhonePe, India's fastest growing digital payments platform, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more details contact:** media@flipkart.com